संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com








● वर्ष : ७ वे ● ● अंक : ९६ वा ● ● मंगळवार दि. ९ जानेवारी २०२४ ● ● किंमत २ रू ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025


# पलूसमध्ये तलाठ्यास लाच घेताना रंगेहात पकडले

## पंधरा दिवसात दुसरा तलाठी लाच घेताना सापडला : महसूलची प्रतिमा कधी सुधारणार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** पलूस येथे खरेदी केलेल्या जमिनीची ७/१२ सदरी नोंद करण्यासाठी तब्बल ४० हजार रुपयांची लाच मागून ती स्विकारताना बाळासो जाधव, वय-३९ वर्षे, तलाठो पलूस, ता. पलूस जि.सांगली या तलाठ्यास लाचलुचपत विभागाने रंगेहाथ पकडले असून या घटनेने महसूल प्रशासनामध्ये मोठी खळबळ उडाली असून पंधरा दिवसात लाचलुचपतच्या जाळ्यात जिल्ह्यातील सलग दुसरा तलाठी सापडल्याने यामुळे महसूलची प्रतिमा कधी डागाळली गेली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, तक्रारदार व त्यांचे बडील यांनी खरेदी केलेल्या जमिनीची ७/१२ सदरी नोंद घेवून ७/१२ उतारा देणेकरीता तलाठी बाबुराव बाळासो जाधव यांनी तक्रारदार यांचेकडे ४०,००० हजार रूपयांच्या लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी लाचलुचपत पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ०५ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये लोकसेवक बाबुराव बाळासो जाधव, तलाठी पलूस यांनी तक्रारदार व त्यांचे वडील यांनी खरेदी केलेल्या जमिनीची ७/१२ सदरी नोंद घेवून ७/१२ उतारा देणेकरीता ४०,००० हजार रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ३२,००० हजार रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दिनांक ०८ रोजी तहसिल कार्यालय, पलूस या ठिकाणी सापळा लावला असता लोकसेवक बाबुराव बाळासो जाधव, तलाठी पलूस यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून ३२,००० हजार रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. त्या अनुषंगाने लोकसेवक बाबुराव बाळासो जाधव, तलाठी पलूस रा. बुर्ली, ता.पलूस जि.सांगली यांचेविरुध्द पलूस पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई अमोल तांबे पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, विजय चौधरी सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली संदीप पाटील, पोलीस उप अधीक्षक, पोलीस निरीक्षक दत्तात्रय पुजारी, पोलीस निरीक्षक विनायक भिलारे, पोलीस अंमलदार प्रितम चोगुले, धनंजय खाडे, अजित पाटील, सलीम मकानदार, चंद्रकांत जाधव, पोपट पाटील, ऋषीकेश बडणीकर, सुदर्शन पाटील, रामहरी वाघमोडे, चालक वंटमुरे यांनी केली आहे.

**लाच मागत असल्यास**
**या ठिकाणी करा तक्रार**

लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अँप नंबर व मोबाईल नंबर ९८२१८८०७३७ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

# रिपब्लिकन पार्टी कडून पत्रकारांचा सन्मान



**आटपाडी : येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित पत्रकार व मान्यवर**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाकडून (आठवले गट) यांच्या आटपाडी येथील श्रीमंत बाबासाहेब देशमुख सभागृह पंचायत समिती पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.

प्रारंभी स्वागत, प्रास्तावीक सुत्रसंचालन शाम ऐवळे यांनी केले. तालुका पत्रकार संघाचे नुतन अध्यक्ष लक्ष्मण सरगर, समाधान ऐवळे, पत्रकार सुरज मुल्ला, अच्युत गिड्डे यांनी यावेळी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमास राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष उमाजी चव्हाण, दै. पुढारीचे तालुका प्रमुख प्रशांत भंडारे, जनप्रवासचे तालुका प्रतिनिधी सुशांत कासार, दैनिक माणदेश एक्सप्रेसचे संपादक दीपक प्रक्षाळे, दैनिक माणदेश एक्सप्रेसचे उपसंपादक धीरज प्रक्षाळे, दै. तरुण भारतचे मुज्जू तांबोळी, दै.लोकमतचे अमोल काटे यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास विजय पवार, किरण सोहनी, विजय वाघमारे, रणजीत ऐवळे, जनार्दन मोटे, शरद वाघमारे, राजेंद्र मोटे, शशिकांत मोटे, महेश काटे इत्यादी अनेक जण उपस्थित होते. आभार सुरेश मोटे यांनी मानले.

# 'त्या' लॉज मालकावर गुन्हा दाखल करा : ॲड स्वाती शिंदे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुक्यातील तीन अल्पवयीन मुलींच्यावर झालेल्या अत्याचाराने पीडित कुटुंबीय संरक्षण द्यावे व लॉज मालकावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश सरचिटणीस ड. स्वाती शिंदे यांनी आटपाडी पोलिसांना केली.

आटपाडी तालुक्यात अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचार प्रकरणात तपास असणारे पोलीस अधिकारी यांची पिडीत मुली आणि कुटुंबियांची भाजपा महिला मोर्चाच्या प्रदेश सरचिटणीस ड. स्वाती शिंदे यांनी भेट घेतली. यावेळी त्यांनी पिडीत मुलीच्या कुटुंबीयांना संरक्षण देण्यात यावे, यासह लॉज मालकावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

वयाने अत्यंत लहान असलेल्या या मुलींना फिरायला आणि जेवायला नेण्याच्या आमिषाने फुस लावून लॉजवर नेत बलात्कार केल्याचा प्रकार घडला आहे. या प्रकरणाचे तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय कोळेकर यांची भाजपाच्या ड स्वाती शिंदे यांनी भेट घेत त्यांच्याकडून घटनेची माहिती घेतली. तसेच सदरच्या गुन्हाची केस जलद न्यायालयात चालवून आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा झाली पाहिजे यासाठी जलद व सखोल तपास करा, अशी मागणी केली. यावेळी आटपाडीतील भाजपा महिला मोर्चा व भाजपा युवा मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# आटपाडीत खोटे सोने गहाण ठेवत दोन लाखांची फसवणूक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी शहरातील एका खाजगी व्यवसायिकाला खोटे सोने गहाण ठेवत दोन लाख रुपयाला फसवणूक केल्याची घटना घडली. याबाबत आटपाडी पोलीस ठाण्यात यशराज नारायण गावडे रा.अनकढाळ ता. सांगोला जि सोलापूर याच्या विरोधात प्रदीप नारायण जाधव, यशराज हॉटेल शेजारी बायपास रोड आटपाडी यांनी फिर्याद दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, आटपाडी बायपास रोड वर असणाऱ्या यशराज हॉटेल शेजारी असणाऱ्या खाजगी सोने व्यवसायिक असणाऱ्या प्रदीप जाधव यांच्याकडे यशराज गावडे याने ४० ग्राम ९०० मिली ग्राम सोन्याच्या दोन पाटल्याचे दोन जोड गहाण ठेवत आर्थिक अडचण असल्याचे कारण देत दोन लाख रुपये घेतले होते.

यावेळी प्रदीप जाधव यांनी सोन्याची सत्यता पडताळणीच केली नव्हती. पुन्हा २८ डिसेंबर रोजी यशराज गावडे हा त्याच प्रकारचे व त्याच वजनाच्या पाटल्याचे जोड घेऊन आला होता. व पुन्हा आर्थिक अडचण सांगत अजून रक्कम मागत होता. दरम्यान यावेळी व्यवसायिक असणारे प्रदीप जाधव यांना सोन्याच्या सत्यता बाबत शंका निर्माण झाली असता त्यांनी पाटल्याची चाचणी घेणार असल्याचे सांगताच आरोपी यशराज गावडे याने मी वडिलांना विचारून येतो असे सांगत तेथून पोबारा केला.

यावेळी व्यवसायिक प्रदीप जाधव यांनी यशराज गावडे याने पूर्वी ठेवलेल्या सोन्याची शुद्धता पाहिली असता ते बनावट असल्याचे त्याच्या निदर्शनास आले. दरम्यान यावेळी आरोपी यशराज गावडे यांच्याकडे संपर्क साधला असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिल्याने अखेर व्यवसायिक प्रदीप जाधव यांनी शुक्रवारी ५ जानेवारी रोजी आटपाडी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

# आमदार अपात्रता याचिकांवर उद्या निकाल

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या शिवसेना आमदारांच्या अपात्रता याचिकांवर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर बुधवारी (दि. १०) निकाल देणार आहेत. आमदारांच्या अपात्रतेवर देशात पहिल्यांदाच अशा स्वरूपाची सुनावणी झाली आहे. त्यामुळे नार्वेकरांनी काहीही निकाल दिला, तरी तो देशाच्या संसदीय राजकारणात महत्त्वाचा संदर्भबिंदू ठरणार आहे. विधिमंडळाच्या मध्यवर्ती सभागृहात दुपारी चार वाजता नार्वेकरांकडून निकालाचे वाचन केले जाणार असल्याची माहिती मिळाली आहे.



उद्धव ठाकरे



एकनाथ शिंदे

शिवसेना फुटल्यानंतर सर्वोच्च न्यायालयात मोठी कायदेशीर लढाई राज्याचे लक्ष लागलेल्या आमदार अपात्रता याचिकांवर उद्या निकाल राजकीय वर्तुळात प्रचंड उत्सुकता; दुपारी चार वाजता निकालाचे वाचन झाली. शिंदे गटाने स्वतःला वेगळा गट न म्हणता आपणच मूळ पक्ष असल्याचा दावा केला. त्यामुळे दहाव्या सूचीनुसार, बंडखोर अथवा पक्षातून फुटलेल्या आमदारांना थेट अपात्र ठरविण्याच्या मुद्द्यावर कायदेशीर पेच निर्माण झाला. त्यावर, सर्वोच्च न्यायालयात जवळपास दहा महिने खल झाला. अखेर, दहाव्या सूचीनुसार, अपात्रतेचा निर्णय विधानसभा अध्यक्षांकडे सोपविण्याचा निर्णय न्यायालयाने घेतला. मात्र, १४ मे २०२२ रोजीच्या या निकालानंतर विधानसभा अध्यक्षांनी जवळपास पाच महिन्यांनी कामकाज सुरू केले, त्यासाठीही सर्वोच्च न्यायालयाला ताशेरे ओढावे लागले होते.

विधानसभा अध्यक्षांनी १४ सप्टेंबर ते २० डिसेंबर या कालावधीत अपात्रता याचिकांवरील सुनावणीचे कामकाज घेतले. या सर्व याचिकांवर बुधवारी निकाल दिला जाणार आहे. जवळपास पाचशे पानांचे हे निकालपत्र असल्याचे समजते. सोयीसाठी सर्व याचिकांची पाच गटांत वर्गवारी करण्यात आली होती. त्यानुसार या पाच गटांतील निकालाचे महत्त्वाचे मुद्दे विधानसभा अध्यक्ष वाचून दाखवतील; तर सविस्तर निकालाची प्रत दोन्ही गटांना पाठविली जाणार असल्याचे समजते.

# विनायक ऐवळे याची राज्यस्तरीय संशोधन महोत्सवासाठी निवड

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथे आयोजित चौदाव्या आंतर महाविद्यालयीन विद्यापीठ स्तरीय अविष्कार २०२३-२४ संशोधन महोत्सवात सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय पंढरपूर येथे शिकणारा विद्यार्थी विनायक राम ऐवळे रा. आटपाडी जि. सांगली ह्या विद्यार्थ्याने हॅन्ड गेस्चर कंट्रोल रोबोटिक सिस्टीम फॉर फिजिकली चॅलेंज पर्सन मेडिसिन अँड फार्मसी या विभागातून प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले.



विनायक ऐवळे

ह्या संशोधन महोत्सवामध्ये सहा प्रवर्गातून ४०० हून जास्त संशोधकांनी सहभाग नोंदविला होता. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करीत त्याने हे यश संपादन केले. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक येथे दिनांक १२ ते १५ जानेवारी २०२४ ला होणाऱ्या राज्यस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवासाठी त्याची निवड झाल्याने सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय समन्वयक प्रा. गणेश लकडे तसेच प्राचार्य डॉ. कैलास करांडे, उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी, प्रा.उमेश घोलप व प्रा.अविनाश हराळे यांनी पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# आटपाडी युवा सेना तालुकाप्रमुखपदी मनोज नांगरे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुका युवसेना तालुकाप्रमुखपदी आटपाडी (नांगरेमळा) येथील युवा नेते मनोज नांगरे यांची निवड झाली असून राज्याचे शिक्षणमंत्री दिपक केसरकर, उद्योगमंत्री उदय सामंत, उत्पादन शुल्क मंत्री शमुराज देसाई यांच्या उपस्थितीत विटा येथे आमदार अनिलराव बाबर यांच्या वाढदिवसानिमित आयोजित शेतकरी मेळाव्यात मनोज नांगरे-पाटील यांना निवडीचे पत्र देण्यात आले. आमदार अनिलभाऊ बाबर यांच्यामुळे सर्वसामान्यांना मोठा न्याय मिळाला आहे. आमच्या भुमिकेला मिळाला असुन येणाऱ्या कालावधीत युवासेना भक्कम करू असा विश्वास निवडी नंतर युवा सेना तालुकप्रमुख मनोज नांगरे यांनी केला. त्यांच्या निवडीमुळे त्यांचे समाजातील सर्व स्तरातील मान्यवरांच्याकडून अभिनंदन होत आहे.






# कुपवाड चोरीप्रकरणी एकास अटक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** कुपवाड एमआयडीसीतील प्युअर क्रॉप बायोटेक प्रा. लि. या शेती ओषधे उत्पादीत करणार्या कंपनीतील १ लाख ११ हजार रुपयांच्या औषधांची चोरी केल्याप्रकरणी कुपवाड पोलिसांनी कंपनीतील कामगाराला अटक केली. त्याच्याकडून चोरीतील सर्व मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. दत्तात्रयकुमार कांबळे (वय ४०, सध्या रा. श्रीनगर, कुपवाड, मूळ रा. शेवाळे गल्ली, म्हसोबा मंदिराजवळ, खणभाग सांगली) असे अटक केलेल्या संशयिताचे नाव आहे.



**सांगली : कुपवाड एमआयडीसीतील प्युअर क्रॉप बायोटेक प्रा.लि. कंपनीत चोरी करणारा चोरटा व तपास करणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी**

फिर्यादी नितीन महादेव जाधव (सध्या रा. ओम बंगला, लक्ष्मी मंदिराजवळ, विश्रामबाग, सांगली, मूळ गाव मोजे डिग्रज, ता. मिरज) यांची कुपवाड एमआयडीसीत प्युअर क्रॉप बायोटेक प्रा. लि. या नावाची शेतीची औषधे उत्पादीत करणारी कंपनी आहे. या कंपनीत संशयित दत्तात्रय कांबळे हा कामगार काम करीत होता. संशयित कांबळे या कामगाराने सोमवार दि. १ जानेवारी २०२४ रोजी मध्यरात्री कंपनीच्या खिडकीचा दरवाजा उघडूनशटरचे नटबोल्ट काढून कंपनीत प्रवेश केला. कंपनीच्या आतील गोदामाची दोन कुलपे कशाने तरी काढून आत प्रवेश केला. एकूण १ लाख ११ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरी करून नेल्याची तक्रार मालक जाधव यांनी कुपवाड पोलिस ठाण्यात दाखल केली होती.

पोलिसांनी संशयित कांबळे याचा शोध घेऊन ताब्यात घेतले. तसेच चोरीतील मुद्देमाल कांबळे याने त्याचा मित्र रुपेश शिवाजी किनरे (रा. हरिपूर रोड, मंगलमूर्ती कॉलनी, सांगली) याच्या घरात ठेवला असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी संशयित दत्तात्रय कांबळे याला अटक करून चोरीतील सर्व १ लाख ११ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

## संपादकीय

# सर्वांसमोर कायदा समान

मे २००२ मध्ये गुजरातमध्ये घडलेल्या दंगलीत बिल्किस बानो या महिलेवर सामूहिक बलात्कार करण्यात आला होता. तसेच तिच्या कुटुंबियांचीही हत्या करण्यात आली. याप्रकरणी २००८ साली विशेष न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. परंतु, १५ ऑगस्ट २०२२ साली गुजरात सरकारने त्यांची शिक्षा रद्द करून त्यांची सुटका केली. या सुटकेच्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाने निकाल देऊन ही शिक्षामाफी रद्दबातल केली आहे. यावर बिल्किस बानोने आता प्रतिक्रिया दिली आहे. या निर्णयामुळे मी आता पुन्हा श्वास घेऊ शकते, अशी प्रतिक्रिया तिने व्यक्त केली.

आज खरोखरच माझ्यासाठी नवीन वर्ष आहे. माझ्या डोळ्यांत समाधानाचे अश्रू आहेत. गेल्या दीड वर्षांत मी पहिल्यांदाच हसले आहे. निकाल लागल्यानंतर मी माझ्या मुलांना मिठी मारली. माझ्या मनावरचं मोठं दडपण दूर झालंय, आता जीव भांड्यात पडला आहे आणि मी मोकळा श्वास घेऊ शकते आहे, या आशयाचं वक्तव्य बिल्किस बानोने केलं. तसंच, माझ्यासाठी हाच न्याय वाटतो. मला, माझ्या मुलांना आणि स्त्रियांना समान न्याय देण्याच्या वचनाची आशा दिल्याबद्दल मी माननीय सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानते, असंही बिल्किस बानो म्हणाली.

यावेळी तीने बिल्किस बानोच्या समर्थनार्थ उभे राहिलेल्यांचेही आभार मानले. मी आधीही म्हणाले होते आणि आज पुन्हा सांगते, माझ्यासारख्या महिलेचा प्रवास एकट्याने कधीच होऊ शकत नाही. माझे पती आणि माझी मुले माझ्यासोबत आहेत. या द्वेषाच्या काळात मला माझ्या मित्रांनी खूप प्रेम दिलं आणि या कठीण काळात माझ्यासोबत ते उभे राहिले. माझ्याकडे एक अधिवक्ता शोभा गुप्ता या असाधारण वकील आहेत. त्या २० वर्षांहून अधिक काळ माझ्यासोबत राहिल्या. दीड वर्षापूर्वी, १५ ऑगस्ट २०२२ रोजी ज्यांनी माझे कुटुंब उद्धवस्त केले होते आणि माझ्या अस्तित्वाला धक्का पोहोचवला होता, त्या आरोपींना सोडून देण्यात आलं होतं. तेव्हा मी पूर्णपणे कोसळले होते. मला वाटलं की आता माझं धैर्य संपलं आहे. पण अनेकांनी मला सहकार्य केलं. भारतातील हजारो सामान्य लोक आणि महिला पुढे आल्या. या महिला माझ्यासोबत उभे राहिल्या, माझ्या बाजूने बोलल्या आणि सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली, असंही बानो म्हणाल्या.

देशभरातून सहा हजार लोकांनी आणि मुंबईतील ८ हजार ५०० लोकांनी अपील लिहिली ; १० हजार लोकांनी खुले पत्र लिहिले. तसेच कर्नाटकातील २९ जिल्ह्यांतील ४० हजार लोकांनी पत्र लिहिले. या प्रत्येक लोकांसाठी, तुमच्या मौल्यवान एकता आणि सामर्थ्याबद्दल मी खूप आभार मानते. फक्त माझ्यासाठीच नाही तर भारतातील प्रत्येक स्त्रीला न्याय मिळवून देण्याची, संघर्ष करण्याची इच्छाशक्ती तुम्ही मला दिली. मी आपली आभारी आहे. माझ्या स्वतःच्या आणि मुलांच्या आयुष्यासाठी या निकाला महत्त्वपूर्ण आहे. आज माझ्या हृदयातून निघणारी प्रार्थना सोपी आहे, सर्वांसमोर कायदा समान आहे, असंही बानो म्हणाल्या. त्यामुळे देशात कायदा सर्वासाठी समान आहे हे मात्र नक्की!

# युवा महोत्सवाच्या माध्यमातून नाशिकची जागतिकस्तरावर ब्रॅण्डिंग करण्याची संधी - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**नाशिक :** नाशिक शहरात २७ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन होत आहे. या महोत्सवाचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवार १२ जानेवारी २०२४ रोजी होणार आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून राज्याची सांस्कृतिक परंपरा व नाशिक जिल्ह्याची जागतिकस्तरावर ब्रॅण्डिंग करण्याची संधी प्राप्त झाली आहे. त्या संधीचे आपण सर्वांनी सोने करावे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

तपोवन मैदान येथे राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या उद्घाटन स्थळाची आज पाहणी करून महोत्सवाच्या नियोजनाबाबत आढावा बैठक झाली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे, खासदार हेमंत गोडसे, आमदार देवयानी फरांदे, सीमा हिरे, सुहास कांदे, ड. राहुल ढिकले, विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, क्रीडा आयुक्त सुहास धिवसे, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी जलज शर्मा, नाशिक महानगरपालिका आयुक्त डॉ. अशोक करंजकर, पोलिस अधीक्षक शहाजी उमाप, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा यांच्यासह प्रमुख अधिकारी उपस्थित होते.



मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, नाशिक येथे होणाऱ्या २७ व्या राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या अनुषंगाने मुख्य उद्घाटन कार्यक्रम हा तपोवन मैदान येथे होणार असल्याने राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या आयोजन संदर्भात बैठका घेण्यात आल्या आहेत. या महोत्सवाच्या आयोजनासाठी २० समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या मॅस्कट व लोगोचेही अनावरण करण्यात आले आहे. या महोत्सवासाठी देशाच्या विविध भागातून जवळपास ८ हजार युवा सहभागी होणार आहेत. त्यांच्या निवास व खानपान व्यवस्थेमध्ये कोणतीही उणीव राहणार नाही, याबाबत काटेकोरपणे नियोजन करण्याच्या सूचना दिल्या.

हनुमाननगर येथील सुविचार स्पर्धा, युवा संमेलन व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. महाकवी कालिदास कलामंदिर येथे सांघिक लोकनृत्य, वैयक्तिक लोकगीत व वक्तृत्व स्पर्धा, तर महात्मा फुले कलादालनात छायाचित्र स्पर्धा होणार आहे. गंगापूर रोड येथील रावसाहेब थोरात सभागृहात सांघिक लोकगीत व वैयक्तिक लोकगीत आणि उदोजी महाराज म्युझियम येथे यंग कलाकार शिबिर, पोस्टर मेकिंग व कथा लेखन असे अनेक वेगवेगळ्या ठिकाणी कार्यक्रम होणार आहेत. या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन ही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी केले.

# कोल्हापूर, सांगली पूर व्यवस्थापन प्रकल्पाला जागतिक बँक, अर्थ मंत्रालयाची मंजुरी

**मुंबई :** कोल्हापूर, सांगली भागातील पूर व्यवस्थापन करणे आणि पावसाळ्यात ते पाणी दुष्काळी मराठवाड्यात देणे, या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला वित्तसहाय्य करण्यास जागतिक बँकेने मंजुरी दिली आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा, अशा दोन्ही भागांना मोठा दिलासा देणारा हा प्रकल्प ठरणार आहे. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी याबद्दल जागतिक बँक, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे आभार मानले आहेत.

१२ सप्टेंबर २०१९ रोजी जागतिक बँकेच्या पथकाने या पूरग्रस्त भागाची पाहणी केली होती आणि त्यानंतर लगेचच उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्यासोबत बैठक झाली होती. त्याचसुमारास हा प्रकल्प करण्याचे निश्चित झाले होते. या प्रकल्पात जागतिक बँक २८० मिलियन डॉलर्स (सुमारे २३२८ कोटी रुपये), तर राज्य सरकार सुमारे १२० मिलियन डॉलर्स (सुमारे ९९८ कोटी रुपये) असे योगदान देणार आहे. एकूण ४०० मिलियन डॉलर्सचा हा प्रकल्प असणार आहे.

महाराष्ट्रात एकीकडे तीव्र दुष्काळ, तर दुसरीकडे अतिवृष्टी अशी परिस्थिती निर्माण होते. हवामान बदलाबाबत व्यापक दृष्टिकोनातून विचार करण्याची हीच वेळ आहे. अनेक जागतिक संस्थांच्या गाठिशी आपत्ती व्यवस्थापनाचा उत्तम अनुभव गाठिशी असतो. अशावेळी पुराच्या भागातील पाणी दुष्काळी भागात वळवून एकाचवेळी दोन्ही क्षेत्रांना आपण दिलासा देऊ शकतो, अशी भूमिका उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सातत्याने मांडली होती. त्यातून महाराष्ट्र वातावरणपूरक विकास कार्यक्रमाची आखणी झाली. आता या प्रकल्पाच्या माध्यमातून कृष्णा आणि भीमा नदी खोऱ्यात प्रगत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कामे करणे शक्य होणार आहे. पूररेषा आखणे, नदी खोलीकरण, गाळ काढणे अशी अनेक कामे हाती घेण्यात येणार आहेत. नीती आयोगाने सुद्धा याबाबत पूरक अहवाल दिला होता. एकिकृत जलव्यवस्थापन आणि देखरेख प्रणालीतून अतिरिक्त पाणी दुष्काळी भागात वळवणे सुद्धा यातून शक्य होणार आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा, अशा दोन्ही क्षेत्रांना या प्रकल्पातून मोठा लाभ होईल, असे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी म्हटले आहे.


माणदेश एक्सप्रेस
व्यवसायिक जाहिरात योजना
आपल्या व्यवसायाचा प्रचार, प्रसार करण्यासाठी दैनिक 'माणदेश एक्सप्रेस' ने आणली आहे अल्प दरात जाहिरात योजना आहे.
आटपाडी तालुक्यासह सांगली तसेच माणदेशातील अग्रगण्य दैनिक माणदेश एक्सप्रेस च्या माध्यमातुन आपली जाहिरात ५० हजार लोकपर्यंत पोहचवा.

| 10 X 5 cm | 10 X 10 cm | 20 X 7 cm | 20 X 13 cm |
|---|---|---|---|
| १००० /- रुपयात महिनाभर | २००० /- रुपयात महिनाभर | ३००० /- रुपयात महिनाभर | ४००० /- रुपयात महिनाभर |

टीप : आतील पानासाठी हे दर १० टक्के कमी आहेत
याशिवाय विशेष स्किम, विविध योजांची माहिती देणाऱ्या बातम्यांना प्रसिद्धी दिली जाईल.
आजच संपर्क करा
९५९५०४७६७६, ९५०३६३८६८६














दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस






## सतीश सावंत यांची निवड


सतीश सावंत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगोला :** डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्या राज्याच्या उपाध्यक्षपदी सांगोल्याचे सतीश सावंत यांची निवड करण्यात आली आहे. डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संपादक राजा माने यांनी त्यांना निवडीचे पत्र दिले आहे.

डिजिटल मीडिया क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व घटकाची ही जोपासण्यासाठी आणि या माध्यमाला सामाजिक मूल्य तसेच सामाजिक जबाबदारीच्या चौकटीत कार्यरत करण्यासाठी सदैव कार्यशील असल्यामुळे व संघटनेच्या स्थापनेपासून संघटना बळकट करून संघटना वाढीसाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणारे सतीश यांची डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व राज्यातील जेष्ठ विचारवंत ज्येष्ठ संपादक राजा माने यांनी राज्याच्या उपाध्यक्षपदी निवड करून त्यांना निवडीचे पत्र दिले आहे.

## तंबाखूमुक्त शाळेसाठी व्यापक जनजागृती करा : ज्योती पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** जिल्ह्यातील सर्व शाळा तंबाखूमुक्त व्हाव्यात, यासाठी आरोग्य व शिक्षण विभागाने व्यापक जनजागृती मोहीम राबवावी. शाळा, कॉलेजजवळ तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्यांविरूध्द कारवाईमध्ये सातत्य ठेवावे, अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील यांनी दिल्या.


सांगली : राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय समिती समन्वय समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. यावेळी बैठकीस उपस्थित अधिकारी

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय समिती समन्वय समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. बैठकीस जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम, महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. वैभव पाटील, जिल्हा माता बालसंगोपन अधिकारी डॉ. विवेक पाटील, पोलीस निरीक्षक अरविंद बोडके, विलिंग्डन कॉलेजचे प्राचार्य डॉ. भास्कर ताह्मणकर, सहायक आयुक्त (अन्न) नि. सु. मसारे, जिल्हा सल्लागार डॉ. मुजाहिद आलासकर आदि उपस्थित होते.

निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील म्हणाल्या, तंबाखूच्या दुष्परिणामबाबत शाळा, कॉलेज स्तरावर व्यापक जनजागृती करावी. शालेय परिसरात व सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणाऱ्यांवर कारवाई करावी. कोटपा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता तालुकास्तरीय समन्वय व सनियंत्रण समितीची स्थापना सर्व तालुक्यामध्ये करावी, अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती पाटील यांनी बैठकीत दिल्या.

तंबाखू मुक्तीसाठी समुपदेशन केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. तंबाखू सेवनाचे व्यसन सोडण्यासाठी १८००११२३५६ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधवा, असे बैठकीत सांगण्यात आले. दरम्यान, राष्ट्रीय वातावरणातील बदल आणि मानवी आरोग्य कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय टास्क फोर्स समितीच्या सभेत कामकाजाचा आढावा यावेळी घेण्यात आला.

## विद्यार्थ्यांनी वेळेत जात प्रमाणपत्र पडताळणी करून घ्यावी : गणेश सवाखंडे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** व्यवसाय शिक्षणात शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक आहे. शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी वेळेत जात प्रमाणपत्र पडताळणी करून घ्यावी, असे प्रतिपादन समतादूत प्रकल्पाचे जिल्हा प्रकल्प अधिकारी गणेश सवाखंडे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था व जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी सांगली यांच्या वतीने शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय मिरज येथे आयोजित जात प्रमाणपत्र पडताळणी शिबिरात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या अध्यक्षा नंदिनी आवडे, उपायुक्त नितीन ढगे, संशोधन अधिकारी जयंत चाचरकर यांच्या मार्गदर्शनाखाली


सांगली : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था व जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी सांगली यांच्या वतीने मिरज येथे जात प्रमाणपत्र पडताळणी शिबिरात मार्गदर्शन करताना गणेश सवाखंडे

कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय मिरजचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील प्रा. पी. एम. सुतार, प्राध्यापिका श्रीमती एम. एस. पाटील, प्रा. ए. आर. गाताडे, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी वेळेत जात पडताळणी करून भावी काळात मिळणाऱ्या शैक्षणिक सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन करून श्री. सवाखंडे यांनी जात पडताळणी कशी करावी याबाबत इयत्ता अकरावी आणि बारावी सायन्सच्या विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच, ऑनलाईन अर्ज कसा करावा, यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे, वंशावळ कशी करावी, जातीचे प्रमाणपत्र, मूळ कागदपत्र महसूल पुरावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

जाती प्रमाणपत्र समिती सांगली यांच्या वतीने संपूर्ण सांगली जिल्ह्यातील महाविद्यालयांमध्ये जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याचे यावेळी सांगण्यात आले. उपस्थित पालक व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निराकरण करण्यात आले. समतादूत संग्रामसिंह छत्रे यांनी जात पडताळणी प्रमाणपत्राचे महत्त्व व बार्टीच्या विविध योजनांची माहिती दिली. प्रास्ताविक प्रा. पी. एम. सुतार यांनी केले. स्वागत प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रा. श्रीमती एम. एस. पाटील यांनी मानले.

## १५ जानेवारीला विशेष सैनिक संमेलन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** सशस्त्र सेना दिवसाचे औचित्य साधून महासैनिक दरबार हॉल, सैनिक संकुल सांगली येथे दि. १५ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत विशेष सैनिक संमेलन आयोजित करण्यात आले आहे असल्याचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल डॉ. भिमसेन चवदार (निवृत्त) यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

विशेष सैनिक संमेलनामध्ये पेंशन, स्पर्श पोर्टल, पार्ट टु ऑर्डर, सैन्य अभिलेख कागदपत्रे, केंद्रीय सैनिक बोर्ड व कल्याणकारी निधीतील आर्थिक मदती, इतर शासकीय कार्यालयाशी पत्रव्यहवार व ईसीएचएस बद्दल माहिती व शंकानिरसन करण्यात येणार आहे. नव्याने निवृत्त माजी सैनिकांना ओळखपत्र वाटप व रोजगार नोंदणी करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी ०२३३-२९९०७१२ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा ९४०४९६९१४५ या व्हॉटसप क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही डॉ. चवदार यांनी केले आहे.

## राज्यसभेसाठी आपच्या उमेदवारांचे नामांकन अर्ज दाखल

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षाकडून राज्यसभेसाठी तिन उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले. आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात तुरुंगात असलेले संजय सिंह हे देखील नामांकन अर्ज दाखल करण्यासाठी आले होते. दिल्लीतील राज्यसभेच्या तीन जागा जानेवारी अखेरीस रिक्त होत आहेत. यासाठी १९ जानेवारीला निवडणूक होत आहे. या तीन जागांसाठी आम आदमी पक्षाच्या वतीने संजय सिंह, दिल्ली महिला आयोगाच्या प्रमुख स्वाती मालीवाल आणि नारायण दास गुप्ता यांनी उमेदवारांनी अर्ज दाखल केले.


दिल्लीतून रिक्त होत असलेल्या राज्यसभेच्या तीनही जागांवर आपचे खासदार आहेत. यामध्ये संजय सिंह, नारायण दास गुप्ता आणि सुशील कुमार गुप्ता यांचा समावेश आहे. या तिघांपैकी संजय सिंह आणि नारायणदास गुप्ता यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे. मात्र सुशील कुमार गुप्ता यांचा पत्ता कापण्यात आला. सुशील कुमार गुप्ता यांच्या ठिकाणी दिल्ली महिला आयोगाच्या अध्यक्षा स्वाती मालीवाल यांना आम आदमी पक्षाने संधी दिली आहे.

## ‘सत्यशोधक’ चित्रपटाला करसवलत देण्याबाबत सकारात्मक - उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई :** देशात स्त्री शिक्षणाची मुहुर्तमेढ रोवणारे, बहुजनांसाठी शिक्षणाची दारे खुले करणारे, सत्यशोधक विचारांचे महामानव क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित ‘सत्यशोधक’ चित्रपटाला कर सवलत देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेत यासंदर्भातील प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात आयोजित बैठकीत दिल्या.



चित्रपटांवर आकारण्यात येणाऱ्या १८ टक्के जीएसटीपैकी प्रत्येकी ९ टक्के रक्कम केंद्र आणि राज्य शासनाला मिळत असते. राज्याच्या वाट्याला येणाऱ्या रकमेची कर सवलत देण्याबाबतचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात येणार आहे. महात्मा फुले आणि सावित्रीबाईंचे कार्य अलौकिक असून ते भावी पिढीपर्यंत पोहचविण्यासाठी हा चित्रपट सहाय्यभूत ठरणार असल्याने चित्रपटाला करसवलत दिली पाहिजे, असे मत उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी व्यक्त केले. राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, वित्त, महसूल व सांस्कृतिक कार्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.









# स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार स्पर्धेसाठी प्रवेशिक पाठविण्याचे आवाहन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसाठी प्रकाशन वर्ष २०२३ करिता राज्य शासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांसाठीच्या प्रवेशिका जिल्हाधिकारी कार्यालयात (मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळून), तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयात दिनांक १ ते ३१ जानेवारी २०२४ पर्यंत पाठविता येणार आहेत, असे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सचिव मीनाक्षी पाटील यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

दिनांक १ जानेवारी २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत प्रकाशित झालेली प्रथम आवृत्ती पुस्तके या स्पर्धेसाठी पात्र आहेत. या स्पर्धेची नियमावली व प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२५ यांच्या कार्यालयात तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता अन्यत्र संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात (सर्वसाधारण शाखा अथवा करमणूक शाखा) विनामूल्य उपलब्ध होतील. महाराष्ट्र शासनाच्या ,.ारहरीरीहीीर.सीं.ळप या संकेतस्थळावर 'नवीन संदेश' या सदरात 'स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२३ नियमावली व प्रवेशिका' या शीर्षाखाली व 'What's पशु' या सदरात 'Late Yashwantrao Chavan State Literature ward 2023 Rules Book and pplication Form' या शीर्षाखाली व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या http://sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावर प्रवेशिका व नियमपुस्तिका उपलब्ध होतील.

प्रवेशिका पूर्णतः भरुन आवश्यक साहित्यासह सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयात दिनांक १ ते ३१ जानेवारी २०२४ या विहित कालावधीत पोहोचतील अशा बेताने पाठवाव्यात. लेखक / प्रकाशक या स्पर्धेसाठी प्रवेशिका दाखल करु शकतात. मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यातील लेखक / प्रकाशकांनी पुस्तकांच्या दोन प्रतींसह विहित नमुन्यातील प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२५ येथे पाठवाव्यात. मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळून अन्य ठिकाणच्या लेखक / प्रकाशकांनी संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये हे साहित्य दिनांक १ जानेवारी २०२४ ते ३१ जानेवारी २०२४ या विहित कालावधीत पाठवावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे.

लेखक/ प्रकाशकांनी मंडळाकडे प्रवेशिका व पुस्तके पाठविताना सदर बंद लिफाफ्यावर / पाकिटावर 'स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२३ साठी प्रवेशिका' असा स्पष्ट उल्लेख करावा. प्रवेशिका व पुस्तके स्वीकारण्याचा अंतिम दिनांक ३१ जानेवारी २०२४ राहील. विहित कालमर्यादेनंतर (१ जानेवारी २०२४ ते ३१ जानेवारी २०२४) येणाऱ्या प्रवेशिका स्पर्धेसाठी स्वीकारल्या जाणार नाहीत, असे प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

# नियाज नदाफचे आंतरराष्ट्रीय भाषा विषयात यश



पुणे : सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय भाषा विषयात प्रथम क्रमांक मिळविल्या बद्दल त्याचा सत्कार करताना उपस्थित मान्यवर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी :** आटपाडी येथील श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी नियाज अल्लाबक्ष नदाफ याने आंतरराष्ट्रीय भाषा संस्था यश मिळवले असून त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयाचा माजी विद्याथी असलेला नियाज अल्लाबक्ष नदाफ याने सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय भाषा विषयात प्राविण्य मिळविले. १२ ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या कार्यक्रमात त्याने प्रथम क्रमांक व तसेच ५ जानेवारी २०२४ रोजी झालेल्या कार्यक्रमात प्रथम क्रमांक पटकावत इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट मध्ये बाजी मारली.

नियाज अल्लाबक्ष नदाफ हा आटपाडी येथील सुलतान गादी कारखाना व स्टीलचे मालक अल्लाबक्ष नदाफ यांचा मुलगा असून त्याने मिळविलेल्या या यशाबद्दल त्याच्यावर कौतकाचा वर्षाव होत आहे.

# शिंगणापूर मार्डी रस्त्याच्या साईड पट्ट्या खचल्या !



म्हसवड : शिखर शिंगणापूर रस्त्याची झालेली दुर्दशा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**म्हसवड/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे कुलदैवत शिखर शिंगणापूर रस्त्याची दुर्दशा झाली आहे. अनेक अपघातात प्रवाशांचा जीव जात आहेत, मात्र सार्वजनिक बांधकाम खाते जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप डॉ. संदिप पोळ यांनी केला आहे. या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा पोळ यांनी दिला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, शिखर शिंगणापूर रस्ता गेले अनेक दिवस चर्चेत असून या रस्त्यावर अनेक ठिकाणी गुडघाभर खड्डे पडले असून, या रस्तावरून वाहने चालविणे कठीण झाले आहे. दरम्यान मार्डी ते शिंगणापूर (शिपदरा) या ठिकाणी रस्त्याची साईड पट्टी पूर्णपणे खचली असून आतापर्यंत अनेक अवजड वाहनांचे अपघात झाले असून अनेकांना जीव गमवावा लागला आहे.

अधिकाऱ्यांना अनेक वेळा फोन करून कल्पना दिली, मात्र सार्वजनिक बांधकाम जाणीवपूर्वक या प्रश्नाकडे डोळेझाक करीत असल्याचा आरोप डॉ. संदिप पोळ यांनी केला आहे. त्याच बरोबर म्हसवड शिंगणापूर व दहिवडी मार्डी या रस्त्याच्या साईड पट्ट्या येत्या आठ दिवसात भरून दुरुस्ती करावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा डॉक्टर संदिप पोळ यांनी दिला आहे.

# सर्व भरती प्रक्रिया महाराष्ट्र राज्य सेवा आयोगाकडून घ्याव्या : राजू शेट्टी



मुंबई : भरती प्रक्रिया महाराष्ट्र राज्य सेवा आयोगाकडून घ्याव्या, या मागणीचे निवेदन अजित पवार यांना देताना राजू शेट्टी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** राज्य सरकारने सरळसेवा पध्दतीने तलाठी भरती प्रक्रियाच्या परिक्षा घेण्यात आल्या. यामध्ये मोठ्या प्रमाणात घोटाळे झाले असल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आले आहे. परिक्षा दिलेल्या अनेक विद्यार्थ्यांना २०० मार्काच्या पेपरला २१४ मार्क पडले असल्याचे प्रकार समोर आल्याने परिक्षा कशा पारदर्शक पध्दतीने झाल्या असतील हे दिसून येते. यामुळे सर्व भरती प्रक्रिया महाराष्ट्र राज्य सेवा आयोगाकडून घ्याव्या अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली.

गेल्या अनेक वर्षापासून सरळसेवा भरती प्रक्रियेमध्ये ज्या कंपन्यामार्फत पेपर घेतले जातात त्या घोटाळा करतातच. हे ब-याचवेळेस सिध्द झाले आहे. यामुळे अनेकदा सरकारवर नामुष्की येवून शासनास परिक्षा रद्द कराव्या लागल्या आहेत. आतासुध्दा तलाठी भरती प्रक्रियेत मोठा घोटाळा झालेला असून. यामुळे हुशार, होतकरू व सर्वसामान्य विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकत्याच झालेल्या तलाठी भरती प्रक्रियेत पारदर्शकता आहे असे जर सरकारचे म्हणणे असेल तर या निकालपत्रातील २०० पैकी १२५ पेक्षा जादा गुण ज्या विद्यार्थ्यांना पडलेले आहेत त्या सर्व विद्यार्थ्यांची एमपीएससी परिक्षा घेऊन पात्रता सिध्द करण्यास संधी द्यावी. जर यामध्ये हे विद्यार्थी चांगल्या गुणांनी उतीर्ण झाले तर विद्यार्थ्यांचा सरळसेवा भरती प्रक्रियेवर व शासनावर विश्वास बसेल असे ते म्हणाले.

# सूर्यकुमार यादवला पाठोपाठ २ दुखापती



**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** टी२० चा आघाडीचा फलंदाज सूर्यकुमार यादव याच्या मागील दुखापतीचे शुक्लकाष्ट संपता संपेना झाले आहे. दक्षिण आफ्रिका दौऱ्यात झालेल्या घोट्याच्या दुखापतीमुळे तो अफगाणिस्तानविरुद्धची आगामी टी-२० मालिका खेळू शकणार नाही. तर आता सुर्यकुमारला स्पोर्ट्स हर्निया झाल्याचे वृत्त समोर आले आहे. त्यासाठी त्याला ऑपरेशन करावे लागणार आहे. स्पोर्ट्स हर्नियामुळे तो देशांतर्गत क्रिकेट खेळू शकणार नाही. तर आयपीएल २०२४ च्या पहिल्या काही सामन्यांना तो मुकण्याचीही शक्यता वर्तविली जात आहे.

बीसीसीआयच्या सूत्रांनी सांगितले की, सूर्यकुमार यादवचे नुकतेच स्पोर्ट्स हर्नियाचे निदान झाले आहे. तो सध्या बंगळूर येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत आहे. दोन-तीन दिवसांत तो ऑपरेशनसाठी जर्मनीतील म्युनिकला जाणार आहे. दरम्यान, जूनमध्ये टी-२० विश्वचषक होणार आहे. या स्पर्धेसाठी तो भारतासाठी महत्त्वाचा खेळाडू आहे. त्यामुळे सूर्याला पूर्ण वेळ विश्रांती दिली जाणार आहे. तसेच या मोसमात रणजी करंडक स्पर्धेत मुंबईकडून तो खेळणार नाही. आणि आयपीएलमधील मुंबई इंडियन्सच्या पहिल्या काही सामन्यांना तो मुकण्याची शक्यता आहे.

# भारताविरुद्धच्या मालिकेसाठी अफगाणिस्तान संघाची घोषणा



इब्राहिम झद्रान



रहमानउल्ला गुरबाज

**माणदेश एक्सप्रेस न्युज**


**नवी दिल्ली :** अफगाणिस्तानने शनिवारी भारताविरुद्ध ११ जानेवारीपासून सुरू होणार्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी १९ सदस्यीय संघाची घोषणा केली. नियमित टी-२० कर्णधार राशीद खान संघात नक्कीच आहे; पण पाठीच्या दुखापतीतून तो अद्याप पूर्णपणे सावरलेला नाही. त्यामुळे इब्राहिम झद्रानकडे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे, तर रहमानउल्ला गुरबाज संघाचा उपकर्णधार असणार आहे.

फिरकीपटू मुजीब-उर-रहमान, ज्याला एनओसी रद्द झाल्यानंतर त्याचा 'बीबीएल'चा १३ वा सीझन सोडून भारतीय दौर्यासाठीच्या संघात त्याचा समावेश करण्यात आला आहे. नुकत्याच झालेल्या यूएईविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेत मुजीबही सहभागी नव्हता. यूएईविरुद्धच्या राखीव संघाचा भाग असलेल्या इकराम अलीखिलला बॅकअप यष्टिरक्षक फलंदाज म्हणून मुख्य संघात बढती देण्यात आली आहे.

'एसीबी'चे अध्यक्ष मिरवाईस अश्रफ म्हणाले, तीन सामन्यांच्या मालिकेसाठी आमच्या पहिल्याच भारत दौर्यावर येताना आम्हाला आनंद होत आहे. भारत हा जगातील अव्वल क्रमांकाचा संघ आहे आणि अफगाणिस्तानला त्यांच्याविरुद्ध तीन सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेत खेळताना पाहणे खूप आनंददायी ठरेल. आम्ही भारताविरुद्धच्या अत्यंत स्पर्धात्मक मालिकेसाठी उत्सुक आहोत.

भारताविरुद्ध अफगाणिस्तान संघ : इब्राहिम झद्रान (कर्णधार), रहमानउल्ला गुरबाज (उपकर्णधार), इक्रम अलीखिल (यष्टिरक्षक), हजरतुल्ला झाझाई, रहमत शाह, नजीबुल्ला झद्रान, मोहम्मद नबी, करीम जनात, अजमतुल्ला उमरझाई, शराफुद्दीन अश्रफ, मुजीब-उर-रहमान, फजलहक फारुकी, फरीद अहमद, नवीन-उल-हक, नूर अहमद, मोहम्मद सलीम, कैस अहमद, गुलबदीन नायब आणि राशीद खान

# फुलेवाडा, भिडेवाड्यातील स्मारकांच्या कामासाठी निधी कमी पडू देणार नाही - उपमुख्यमंत्री अजित पवार



**मुंबई :** क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे पुणे येथील राहते घर राहिलेला फुलेवाडा तसेच फुले दाम्पत्याने मुलींची पहिली शाळा सुरु केलेला भिडेवाडा येथे राष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासंदर्भात सादर करण्यात आलेल्या विकास आराखड्यांचा उपमुख्यमंत्री अजित पवार आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी आज मंत्रालयात आढावा घेतला.

देशात स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवून शैक्षणिक, सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रात क्रांतिकारी कार्य करणाऱ्या फुले दांपत्यासारख्या महामानवांचे स्मारक त्याच्या कार्याला न्याय देणारे असले पाहिजे. त्यासाठी हेरिटेज दर्जा आणि आधुनिक वास्तूकलेचा सुरेख मिलाप साधून हे प्रेरणादायी स्मारक तयार करण्यात यावे. स्मारकाच्या कामासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिला.

उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या या बैठकीला अन्न व नागरीपुरवठा मंत्री श्री. भुजबळ, मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सैनिक, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, अल्पसंख्याक विकास विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन, पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव आशिष शर्मा तर, पुणे महापालिका आयुक्त विक्रमकुमार, पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले की, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्यामुळे देशात स्त्री शिक्षणाची सुरुवात झाली. आज समाजाच्या सर्व क्षेत्रात महिला आत्मविश्वासाने वावरताना दिसतात त्याचे श्रेय सर्वस्वी क्रांतिज्योती सावित्रीबाईंना जाते. त्यामुळे सावित्रीबाईंचे कार्य, स्त्री शिक्षणासाठी त्यांनी सोसलेल्या हालअपेष्टा, केलेला त्याग याची माहिती शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली पाहिजे. त्यातून युवा पिढीला मार्गदर्शन, प्रेरणा मिळाली पाहिजे. यासाठी प्रस्तावित स्मारकांमध्ये फुले दांपत्याच्या जीवन कार्याबद्दलची माहिती देणारे थिएटर, यूपीएससी, एमपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन केंद्र, कौशल्य विकासाचे प्रशिक्षण केंद्रासारख्या सुविधा असल्या पाहिजेत. नवे स्मारक पुण्याच्या हेरीटेज वास्तू सौंदर्यात भर घालणारे असले पाहिजे, त्यासाठी आराखड्यावर अधिक काम करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या.

